# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**<u>निवडणूक तात्काळ</u>**
**<u>फॅक्स/ई-मेल/स्पिड पोष्टाने</u>**

क्रमांक - रानिआ/ग्रापंनि/२०११/प्र.क्र. १३/का-०८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १३/१/२०१२.

प्रति,
जिल्हाधिकारी ( सर्व )
( मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्हा वगळून )
( ग्रामपंचायत शाखा )

विषय : माहे एप्रिल-२०१२ ते जून-२०१२ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

संदर्भ : १. राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/ग्रापंनि / २०११/प्र.क्र. ०७/का.०८ दिनांक - ३०/०७/२०११ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षण बाबतच्या कार्यक्रमाचे पत्र
२. राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक - रानिआ / ग्रापंनि / २०११ / प्र.क्र.१३/का.०८ दिनांक ३१/१२/२०११ रोजीचा मतदार यादी प्रसिध्द करणेबाबतच्या कार्यक्रमाचे पत्र

माहे एप्रिल-२०१२ ते जून-२०१२ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा निवडणूक कार्यक्रम (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ) आणि खाली नमूद केलेल्या अ,ब व क येथील पदांसाठी सार्वत्रिक निवडणुका आणि पोट निवडणुका घेण्यासाठी निवडणुकांचा कार्यक्रम सोबत पाठविण्यात येत आहे.

**अ.** ज्या विसर्जीत ग्रामपंचायतींची उर्वरित मुदत सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा विसर्जित ग्रामपंचायतींमधील सर्व पदे.
**ब.** विभाजनामुळे अथवा अन्य कारणाने नव्याने अधिसूचित केलेल्या ग्रामपंचायती मधील सर्व पदे.

**क** आतापावेतो मुदती संपलेल्या ग्रामपंचायतींच्या न्यायालयीन प्रकरणामुळे सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणुका न घेतलेल्या परंतु आता न्यायालयीन निर्णयामुळे निवडणुका घेणे आवश्यक असलेल्या ग्रामपंचायती अथवा इतर अन्य कारणास्तव मुदत संपली असतानाही ज्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका अदयाप घेतलेल्या नाहीत अशा ग्रामपंचायतींतील रिक्त पदे.

२. सन २००१ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेवून प्रभाग रचना व आरक्षण बाबतचा कार्यक्रम आयोगाच्या दिनांक ३०/०७/२०११ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ३०/०८/२०११ रोजी पूर्ण झालेला आहे.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १२ चे पोट कलम ( १ ) मधील तरतुदीनुसार ग्रामंपचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादया ग्राहय धरण्याचा दिनांक ५/१/२०१२ हा अधिसूचित करण्यात आला आहे. प्रभाग निहाय मतदार यादया अधिप्रमाणीत करण्यापूर्वी संबंधित प्रभागाच्या मतदारांच्या ( नागरिकांच्या ) माहितीसाठी दिनांक १२/१/२०१२ रोजी प्रारुप स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत व या यादीमध्ये लेखनिकांच्या चुका किंवा दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकुन अंतर्भूत झाले असल्यास अथवा अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभा मतदार यादीत नावे असूनही त्यांची नावे चुकून प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाची राहून गेली असल्यास, अथवा वगळण्यात आलेल्या मतदारांची नांवे यादीमध्ये वगळलेली नसल्यास त्यांची नावे पुरवणी यादीव्दारे समाविष्ट करावीत अथवा वगळावीत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी किंवा त्यांनी या निवडणुकीसाठी अथवा मतदार यादी तयार करण्यासाठी आदेशाव्दारे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी सदर दुरुस्त्या अत्यंत काळजीपूर्वक कराव्यात. त्यानंतर अंतिम मतदार यादी अधिप्रमाणित करुन अशी अधिप्रमाणित यादी दिनांक १९/१/२०१२ रोजी अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात यावी असे दिनांक ३१/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

४. ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेताना राज्य निवडणूक आयोगाच्या प्रभाग रचनेबाबत दिनांक - ३०/०८/२००५, दिनांक - १९/०६/२००७, दि. १३/५/२०११ रोजीच्या मार्गदर्शक सूचना व दि. १६/५/२०११ रोजीची मार्गदर्शन पत्रे तसेच निवडणुकीबाबत मार्गदर्शक सूचना दिनांक - २६/०९/२००५ मधील सूचनांनुसार व निवडणूक निर्णय अधिका-यांच्या सूचना पुस्तिकेतील ( R.O.Handbook ) सूचनांनुसार कार्यवाही करावी.

५ या निवडणूक कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येणा-या सर्व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांचे मतदान (E.V.M.) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे घेण्यात येईल.ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे क्रमांक - रानिआ/२००७/प्र.क्र.०३/का-०८ चे आदेश दिनांक २९ मार्च,२००७ रोजी महाराष्ट्र शासन

राजपत्रात प्रसिध्द झालेले असून आयोगाचे दिनांक - ०४/०४/२००७ चे पत्रान्वये पाठविलेले आहे. त्या आदेशानुसार कार्यवाही करावी.

६ ज्या ग्रामपंचायतींच्या विभाजनाचे प्रस्ताव कोणत्याही टप्प्यात प्रलंबित आहेत त्या प्रस्तावाचा विचार न करता मुदत संपणा-या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे हे भारतीय संविधानातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. तरी अशा सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम लावण्यात यावा. या आदेशांचे पालन न चुकता करावे याची विशेष नोंद घ्यावी.

७. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक - एसईसी / जीईएन / २००२ / प्र.क्र.२९ / का-१० दिनांक - १२ जुलै,२००१ अन्वये उमेदवारांने दोनपेक्षा अधिक अपत्ये नसल्याबाबत घोषणापत्र देणे, तसेच आदेश क्रमांक - एसईसी / जीईएन - २००२ / प्र.क्र.८५ / का-०५ दिनांक - १५ मार्च,२००४ अन्वये उमेदवाराकडे अथवा त्याच्या नजिकच्या नातेवाईकांकडे किती संपत्ती आहे,याबाबत तसेच उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे किंवा कसे याबाबत,त्याची शैक्षणिक पात्रता काय आहे, इत्यादीबाबत **घोषणापत्र** सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. **सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना हे घोषणापत्र घेण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.**

८. ज्यांना आरक्षित जागांवर ग्रामपंचायत निवडणूक लढविण्याची इच्छा आहे, त्यांनी संबंधित आरक्षित जागांकरिता आवश्यक ते जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र वेळीच उपलब्ध करुन घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना सूचना देवून अवगत करावे. तसेच शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या दिनांक ९/६/२०१० रोजीच्या अध्यादेशान्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मध्ये सुधारणा केल्यानुसार जाती प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र किंवा जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र वैधता तपासणीसाठी दिले आहे त्याचा पुरावा (एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी इच्छूक उमेदवाराने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे उमेदवाराने असा अर्ज केला असल्याबद्दल अन्य कोणताही पुरावा (दोन) उमेदवार निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र तो उमेदवार सादर करेल याबद्दलचे हमीपत्र, नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची तरतूद नमूद केली आहे. संदर्भित अध्यादेश ३१ डिसेंबर, २०१० पर्यतच्या कालावधीसाठी अंमलात होता. त्यास दि. ८ जून, २०११ रोजीच्या अध्यादेशान्वये दि. ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. यामुळे तद्नंतर होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे, याबाबत आयोगाने दिनांक- ९/६/२०११ तसेच दिनांक- ३०/७/२०११ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना अवगत केलेले आहे. तरी याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. हमीपत्राचा नमुना यापूर्वी पाठविण्यात आलेल्या आयोगाच्या क्र. रानिआ / ग्रापनि / २००७ / प्र.क्र.११ / का.८, दि. १४/६/२००७ च्या पत्रासोबत दिला आहे त्याचा वापर करावा.

९.	निवडणुकांच्यावेळी उमेदवारी अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य उमेदवार अर्ज मागे घेतात. अशावेळी तो उमेदवार इतर उमेदवारांना दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे असे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा/२००४/प्र.क्र.३७/का-०५, दिनांक - २३/१२/२००४ अन्वये दिलेला आहे त्याचे पालन करावे.

१०.	ग्रामपंचायत निवडणुका या "तंटा" नसल्यामुळे महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम या योजनेबाबतच्या शासन निर्णयामध्ये "ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करणे" या उपाययोजनेचा समावेश असला तरी आयोगाचे दिनांक १२/११/२००७ चे आदेशानुसार ग्रामपंचायत निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासुन महात्मा गांधी तंटा मुक्त गांव मोहिम योजनेच्या बैठकीमध्ये, जिल्हास्तरावरील किंवा उप विभागीय स्तरावरील अथवा तालुका स्तरावरील कोणत्याही शासकीय अधिका-यांने भाग घेतल्यास तो निवडणूक आचारसंहितेचा भंग मानण्यात येईल व त्यांच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्यात येईल.

११.	ज्या जिल्हयांमध्ये अशा त-हेच्या निवडणुका घेणे आवश्यक राहणार आहे आणि त्यासाठी जो अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमून देण्यात आलेला आहे किंवा ज्यांना निवडणुकीची कर्तव्ये देण्याची शक्यता आहे त्या अधिका-याची अथवा कर्मचा-यांची तसेच ज्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत ती गावे ज्या पोलीस अधिका-यांच्या अधिकार क्षेत्रात येत असतील त्या पोलीस अधिकारी यांच्यासुध्दा निवडणुकांची आचार संहिता अंमलात असताना बदल्या करण्यात येवू नयेत. ग्रामपंचायत क्षेत्रातील पूर परिस्थिती व साथीचे रोग यांचेवर उपाययोजना करणे इत्यादी संदर्भातील कोणत्याही कामकाजास आचार संहितेची बाधा असणार नाही. मात्र या संदर्भात होणा-या कार्यक्रमात मंत्री/खासदार/आमदार व इतर नगर सेवक व पदाधिकारी यांचा सहभाग राहणार नाही व आचार संहितेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या उद्‌घाटनाचा व भूमीपूजनाचा कार्यक्रम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. आवश्यकता असल्यास पूर परिस्थिती व साथीचे रोग यांचे उपाय योजनेत समन्वय असावा यासाठी राज्य शासन विशेष अधिकारी नेमू शकेल. यासंबंधी राज्य निवडणूक आयोगाचे सुधारीत आदेश क्र. स्थास्वसं-२०११/प्र.क्र.२५/का.५, दि. २९/१२/२०११ मधील सूचनांचे पालन करावे.

१२.	संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

१३.	ग्रामपंचायत निवडणूक खर्चाचा तपशिल उमेदवाराने सादर करण्याचे संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - एसईसी/१०९५/१०१/डेस्क -३ दिनांक ७ फेब्रुवारी, १९९५ तसेच ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाची खर्चाची मर्यादा निश्चित करणेबाबत आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.८, दिनांक ३० जुलै, २०११ रोजीचे

आदेशान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासुन ३० दिवसांचे आंत खर्चाचा तपशिल जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा अधिका-याकडे/उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिका-याकडे निवडणूक लढविणा-या उमेदवाराने सादर करण्याचा आहे. खर्चाचा तपशिल विहीत मुदतीत सादर न करणा-या उमेदवारां विरुध्द इंडियन पीनल कोडचे कलम १७१ - आय खाली स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा.

१४. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ मधील पोटकलम १ मध्ये (त्र ५) हा खंड समाविष्ट करण्यात आला आहे. या अनुषंगाने दिनांक- २८ डिसेंबर, २०११ च्या शासन राजपत्रात सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१५. सोबतच्या कार्यक्रमाप्रमाणे उपरोक्त ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्यात येवून पूर्तता अहवाल त्वरीत राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावा. निवडणूक कार्यक्रमानुसार करण्यात येणा-या टप्प्यांची माहिती टप्पा पूर्ण होताच आयोगास फॅक्स / ई-मेलव्दारे पाठविण्यात यावी. यापुढील सर्व अहवाल व झालेल्या मतदानाची टक्केवारीबाबतची माहिती विहित नमुन्यात (एकूण मतदार, एकूण पुरुष, एकूण स्त्रिया) फॅक्सद्वारे / ई-मेलद्वारे संबंधित उपजिल्हाधिकारी यांनी निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी आयोगास तात्काळ पाठवावी. (आयोगाचे फॅक्स क्रमांक, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल ॲड्रेस खाली नमूद करण्यात आले आहेत.) **याबाबत कोणत्याही प्रकारे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित चुका किंवा व्यत्यय होणार नाही व निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निःपक्षपातीपणे व रितसर पार पाडली जाईल याची दक्षता घ्यावी. याबाबत कोणत्याही प्रकारची चूक झाल्यास अथवा जाणीवपूर्वक नियमबाहय कृती केल्याचे आढळल्यास संबंधितांविरुध्द आयोगाचे परिपत्रक दिनांक - ०६/०८/२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई केली जाईल.** सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या खालील नमूद संकेत स्थळावर On Going Election Programs या लिंकवर उपलब्ध आहे.


| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.com |
| फॅक्स क्रमांक | २२८४६७१९ / २२०४६९०९ /२२८४६७२१, |
| दूरध्वनी कमांक | २२०४५०७५ / २२८८६९५० / २२८४६७२० |
| ई मेल ॲड्रेस | १) stateelectioncommission@gmail.com |
| | २) stateelectioncommission@maharashtra.gov.in |


मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

सही/-
( डॉ. अशोक कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव,गृह विभाग,वित्त विभाग,सर्व प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी,सामन्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ यांना कळविण्यात येते की,जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना निवडणूक साहित्य वापरण्यास कृपया परवानगी देण्यात यावी.

४. पोलिस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

५. प्रधान सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.

६. विभागीय आयुक्त ( सर्व ) यांजकडे उचित कार्यवाहीसाठी.

७. संचालक,शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय,चर्नी रोड,मुंबई ४ त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

८. पोलीस महानिरीक्षक ( सर्व ) महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद ( सर्व संबंधित )

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित )

११. माहिती व जनसंपर्क अधिकारी,राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र,मुंबई-३२.

१२. निवड नस्ती ( २ प्रती )

| माहे एप्रिल ते जून २०१२ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची जिल्हानिहाय आकडेवारी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विभाग** | **जिल्हा** | **ग्रा.पं. संख्या** |
| **१** | **कोकण** | ठाणे | २६ |
| **२** | | रत्नागिरी | १ |
| | | **एकूण** | **२७** |
| **३** | **नाशिक** | नाशिक | ६ |
| **४** | | धुळे | १ |
| **५** | | अहमदनगर | १ |
| | | **एकूण** | **८** |
| **६** | **पुणे** | पुणे | २ |
| **७** | | सातारा | १ |
| | | **एकूण** | **३** |
| **८** | **औरंगाबाद** | बीड | १ |
| **९** | | परभणी | १ |
| **१०** | | उस्मानाबाद | १ |
| **११** | | जालना | १ |
| | | **एकूण** | **४** |
| **१२** | **अमरावती** | वाशिम | १ |
| | | **एकूण** | **१** |
| **१३** | **नागपूर** | चंद्रपूर | १ |
| **१४** | | गडचिरोली | ३ |
| | | **एकूण** | **४** |
| **एकूण** | | | **४७** |

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांनी आदेशित केलेला माहे एप्रिल ते जून-२०१२ या कालावधीत मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या तसेच विभाजनामुळे व नव्याने अस्तित्वात आलेल्या स्वतंत्र ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

| | | |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | ५/१/२०१२ (गुरुवार) |
| १ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रत व पोट नियम (२) नुसार नमुना अ अ मधील निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १६/१/२०१२(सोमवार) |
| २ | मुंबई ग्रामपंचायत ( निवडणूक) नियम, १९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) अन्वये **नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ** (नमुना-अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक २४/१/२०१२(मंगळवार) ते दिनांक ३०/१/२०१२(सोमवार) पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत ( निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशनपत्र **छाननी करण्याचा दिनांक व वेळ** (नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ३१/१/२०१२(मंगळवार) सकाळी ११ पासून |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (क) नुसार नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा **अंतिम दिनांक व वेळ** ( नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक २/२/२०१२(गुरुवार) सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत |
| ५ | निवडणूक **चिन्ह नेमून देण्याचा** तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ** | दिनांक २/२/२०१२(गुरुवार) दुपारी ३ नंतर |
| ६ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,१९५९ मधील नियम ७ मधील पोट नियम (१) चा खंड (ड) नुसार आवश्यक असल्यास **मतदानाचा दिनांक** | दिनांक १४/२/२०१२(मंगळवार) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ७ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक **मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.** | दिनांक १५/२/२०१२(बुधवार) |
| ८ | मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,१९५९ मधील नियम,३७ नुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १७/२/२०१२(शुक्रवार) |

राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेशाप्रमाणे,

सही/-
( डॉ. अशोक द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र